


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
यशस्वी लोकांचे किंवा यशाच्या गोष्टी वाचू नका,
त्यात तुम्हाला फक्त संदेश मिळेल.
अपयशाच्या गोष्टी वाचा त्यातून तुम्हाला
नवीन यशाच्या नवीन आयडिया मिळतील.
– डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

वर्ष : ०५ | अंक : ५६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१० ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## नागपुरात एकतर्फी प्रेमातून तरुणाचं धावत्या बसमध्ये संतापजनक कृत्य




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, नागपूर :** युवकाने एकतर्फी प्रेमातून धावत्या बसमध्ये चाकूने वार करून १९ वर्षीय विद्यार्थिनीला ठार मारण्याचा प्रयत्न केला. ही थरारक घटना नरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावरगाव-काटोल मार्गावर घडली. याप्रकरणी पोलिसांनी प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल करून हल्लेखोर युवकाचा शोध सुरू केला आहे. नितीन तागडे असे हल्लेखोराचे नाव आहे. तर मधुरा (नाव बदललेले ) असे जखमी विद्यार्थिनीचे नाव आहे.

पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, मधुराचे वडील टीव्ही दुरूस्तीचे काम करतात. मधुरा ही काटोलमधील एका कॉलेजमध्ये विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षाला शिकते. मुधरा ही खासगी बसने ये-जा करते. ऑक्टोबर २०२३ पासून नितीनही याच बसने जाणे येणे करायचा. तो मधुरावर एकतर्फी प्रेम करायला लागला. २५ ऑगस्टला मधुराचा मित्र अंशुल याने मधुराच्या मोबाइलवर संपर्क साधला. नितीनला तुझ्यासोबत बोलायचे आहे, असे सांगत अंशुलने नितीनला कॉन्फरन्सवर घेतले. 'मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहे, तू माझ्यासोबत लग्न नाही केले तर तुला ठार मारून आत्महत्या करेल', अशी धमकी नितीनने तिला दिली. मधुराने त्याला नकार दिला.

नेहमीप्रमाणे गुरूवारी सकाळी ७.४५ वाजताच्या सुमारास मधुरा ही बसने कॉलेजला जात होती. ८ वाजताच्य सुमारास सावरगाव बस थांब्यावरून नितीन हा बसमध्ये बसला. तो मधुराजवळ आला. 'मी तीन वर्षांपासून तुझ्या मागेमागे फिरत आहे. मला पागल समजली काय?', असे तो मधुराला म्हणाला. 'तुला मी माझ्या मागे फिरायला सांगितले का?' असे मधुरा त्याला म्हणाली.

'तुला काटोलच्या मुलांसोबत लपून-लपून चॅटिंग करायला पाहिजे, मी तुला आणि काटोलच्या मुलांना मारून टाकीन', अशी धमकी नितीनने तिला दिली. त्यानंतर नितीनने खिश्यातून चाकू काढला. मधुराच्या छातीवर वार करायला लागला. बसमधील यश नावाच्या प्रवासी मदतीसाठी धावत यशने नितीनच्या हातातून चाकू हिसकावला. संधी साधून नितीन मागील दरवाजातून बसमधून उडी घेऊन पसार झाला. प्रवाशांनी पीडित मधुराला सावरगावमधील हॉस्पिटलमध्ये दाखल केले. घटनेची माहिती मिळताच नरखेडचे ठाणेदार अजित कदम यांच्यासह पोलिसांचा ताफा हॉस्पिटलमध्ये पोहोचला. मधुराचे बयाण नोंदवित पोलिसांनी खुनाच्या प्रयत्नासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. पोलीस नितीनच्या घरी गेले असता तो घरी आढळून आला नाही. त्याने मोबाइलही स्विच्ड ऑफ केला आहे. नितीन हा एकटा रहातो. त्याचे आई-वडील आणि भाऊ नागपुरात वेगळे राहात असल्याची माहिती आहे.

**नितीनने मधुराच्या आई-वडिलांनाही दिली होती धमकी**

सुमारे तीन वर्षांपूर्वी नितीनचा टीव्ही बंद झाला. त्याने दुरूस्तीसाठी टीव्ही मधुराच्या वडिलांकडे दिला. टीव्ही दुरूस्त न झाल्याने मधुराच्या वडिलांनी टीव्ही दुकानातून बाहेर ठेवला. ८ ऑगस्टला रात्री ११.३० वाजता नितीन हा मधुराच्या घरी आला. दुरूस्तीसाठी दिलेला टीव्ही अद्याप का दुरूस्त केला नाही, अशी विचारणा त्याने मधुराचया वडिलांना केली. टीव्ही दुरूस्त होत नसल्याचे मधुराच्या वडिलांनी त्याला सांगितले. मला माझा टीव्ही दुरूस्त करून परत द्या, अन्यथा तुम्हाला व तुमच्या कुटुंबीयांना संपवेल, अशी धमकी नितीनने मधुराच्या आई-वडिलांना दिली होती.

## महाराष्ट्रात १६ लाख कोटींची गुंतवणूक : उदय सामंत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी अत्यंत चांगलं वातावरण आहे. विश्व आर्थिक मंचावर महाराष्ट्राने इलेक्ट्रिक वाहन, सेमीकंडक्टर, लॉजिस्टिक्स, नवीकरणीय ऊर्जेसहीत विविध क्षेत्रात आघाडीच्या वैश्विक कंपन्यांसोबत १६ लाख कोटींची गुंतवणूक मिळवली आहे. एवढी मोठी गुंतवणूक केवळ गुंतवणूकदारांचा विश्वासावर नव्हे तर धोरणात्मक तत्परता आणि महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा किती मजबूत आहे, हेच दाखवतो, असं महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी म्हटलं.




आज जर्मनी येथे आयोजित News9 Global Summit कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत ह्यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील वाढत्या गुंतवणुकीकडे जर्मनीचं लक्ष वेधलं.

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत-जर्मनी सहकार्य आणि संवादासाठी एक म हत्वपूर्ण व्यासपीठ म्हणून हे News9 Global Summit उल्लेखनीय ठरणार आहे. MIDC मार्फत परदेशात राहणाऱ्या मराठी बांधवांसाठी ५०० एकर जमीन राखीव ठेवण्यात आली आहे, जेणेकरून तेही आपल्या मातृभूमीत उद्योग उभारू शकतील आणि मायदेशी परतू शकतील, असं उदय सामंत म्हणाले.

**महाराष्ट्र नंबर वन !**

आज देशात होणाऱ्या गुंतवणुकीत महाराष्ट्र क्रमांक एकवर आहे. गेल्या काही वर्षांत, World Economic Forum (WEF) दावोस येथे म हाराष्ट्राने २० लाख हजार कोटींहून अधिक मूल्याच्या सामंजस्य करारांवर (MoU)स्वाक्षऱ्या केल्या आहेत. हे महाराष्ट्राच्या उद्योग धोरणांच्या यशाचे आणि गुंतवणूकदारांच्या विश्वासाचे म ोठे उदाहरण आहे, असं सामंत यांनी सांगितलं.

हा यशस्वी प्रवास सरकारने निर्माण केलेल्या पोषक उद्योग वातावरणामुळे शक्य झाला आहे. उद्योजकांना दिल्या जाणाऱ्या विविध योजना, सबसिडी, प्रोत्साहनपर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेगवान निर्णय प्रक्रिया यामुळे आज महाराष्ट्र जगातील आघाडीच्या गुंतवणूक केंद्रांपैकी एक बनला आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. या कार्यक्रम ात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ऑनलाइन उपस्थित होते. तसेच माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, नीती आयोगचे सदस्य आणि अर्थतज्ज्ञ अरविंद वीरमानी, टीव्ही९ नेटवर्कचे एमडी आणि सीईओ बरून दास आदी मान्यवर उपस्थित होते.

## पुतण्यावर विश्वास टाकला- फॉर्च्युनरची कागदपत्रे दिली; पण काकाचा घात झाला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, छत्रपती संभाजीनगर :** बनावट कागदपत्रांआधारे २२ लाखांची आलिशान गाडी पुतण्याने स्वत:च्या नावावर करून घेत, काकांची फसवणूक केल्याचं धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. ही घटना ५ मार्च २०२२ रोजी तोरणागड नगर, मुकुंदवाडी येथे घडली असून फसवणूक करणाऱ्या पुतण्याचं नाव सुन्जोय विश्वनाथ मुळे (रा. किर्ती पार्क, कृष्णानगर, चिंचवड पुणे) असं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रम ेश मुळे यांच्या फॉर्च्युनर कारचा विमा (इन्शुरन्स) संपला होता. तो काढण्यासाठी रमेश मुळे हे गेले असता, रमेश मुळे यांच्या नावावर असलेली कार ही त्यांच्या नावावर नसल्याची माहिती समोर आली आणि त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. रमेश मुळे यांनी कारच्या व्यवहाराची माहिती काढली असता त्यांचा पुतण्या संजय उर्फ सुन्जोय मुळे याने दोन बनावट आधारकार्ड आणि दोन पॅनकार्ड तयार केल्याची माहिती समोर आली. तसंच खोटं गॅजेट दाखल करून नाव बदलाचा बनावट पुरावा तयार केला आणि जुन्या नावाचा वापर करून वाहने खरेदी-विक्री केली. नाशिक महानगरपालिकेकडेही जुन्याच नावाने व्यवहार केल्याची माहिती समोर आली आहे.




या प्रकरणात रमेश अर्जुनराव मुळे (वय ५८, रा. तोरणागडनगर, मुकुंदवाडी ) यांनी तक्रार दिली असून ते समाजसेवक आहेत. मुळे यांनी १६ सप्टेंबर २०१४ रोजी पुणे येथून नवीन फॉर्च्युनर घेतली. तिची नोंदणी पिंपरी-चिंचवड येथील आरटीओमध्ये झाली होती. गाडीवर २२ लाख ५० हजारांचे कर्ज घेतले होते. कर्जाचे सर्व हप्ते रमेश मुळे यांनी वेळोवेळी भरले असून १७ नोव्हेंबर २०२१ रोजी त्यांनी उरलेले ९ लाख भरून कर्ज पूर्ण फेडलं आहे. परंतु, कर्ज पूर्ण भरल्यानंतर बँकेकडून एनओसी आणि मूळ आरसी बुक त्यांनी घेतले नव्हते. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी रमेश मुळे यांनी पुतण्या संजय मुळे याला पॅनकार्ड व आधारकार्ड काही काळासाठी दिले होते. याच दस्तऐवजांचा वापर करून सुन्जोय उर्फ संजय मुळे याने काकांचा घात केला आणि बनावट स्वाक्षऱ्या केल्या. बँकेतील संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून आरसी बुक आणि एनओसी त्याने स्वतः कडे घेतली. तसंच या कागदपत्रांच्या आधारे २२ लाखांची कारही स्वत:च्या नावावर करून घेतली. दरम्यान, या प्रकरणी संजय उर्फ सुन्जोय मुळे याच्याविरोधात मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कोयत्यासह चार जण घुसले अन...
## रेणुका कलाकेंद्रात धक्कादायक घटना

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, अहिल्यानगर :** मागील काही आठवड्यांपासून राज्यातील कलाकेंद्र विविध घटनांमुळे चर्चेत आहेत. पुणे जिल्ह्यातील चौफुला येथे काही दिवसांपूर्वी गोळीबाराची घटना घडल्यानंतर आताजामखेड मोहो येथे रेणुका कलाकेंद्रात थरकाप उडवणारी घटना घडली आहे. चार जणांच्या टोळक्याने हातात कोयते घेऊन थेट स्टेजवर जात नर्तिकांवर हल्ला चढवला. तसंच थिएटर मालकाकडे दरमहा एक लाख रुपयांची खंडणी मागत त्यांनी थिएटरमधील साहित्य आणि नृत्यांगणांची दुचाकी फोडली. यावेळी महिलांची छेडछाड करून अश्लील वर्तन केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेआठच्या सुमारास शुभम लोखंडे, सतीश टकले, नागेश रेडेकर (रा. आष्टी, जि. बीड) व अक्षय मोरे उर्फ चिंग्या (रा. जामखेड) हे चौघे जण कोयते घेऊन थिएटरमध्ये आले. त्यांनी थिएटर मालक अनिल पवार आणि त्यांचे पुत्र परशु व मोहित यांना खंडणी देण्याचा दबाव टाकत धमकावले.

हल्ल्यात खुर्च्या, टेबल, आणि नृत्यांगनेची स्कूटी फोडण्यात आली, तर हस्तक्षेप करणाऱ्या ज्योती जाधव यांच्यावरही हल्ला झाला. शुभम लोखंडे याने त्यांचा ब्लाऊज फाडून धक्का दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. फिर्यादी महिलेच्या तक्रारीनुसार, आरोपींनी यापूर्वीही नवरात्रोत्सवाच्या बॅनरची तोडफोड करून, बीड रोडवरील हॉटेलमध्ये हल्ला केला होता. सतत धमक्या व खंडणी मागणीचे प्रकार सुरु असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

**पुढील तपास सुरू...**

आरोपी शुभम लोखंडे यांनीही प्रतिफिर्याद दाखल केली असून परशु पवार यांनी त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप केला आहे. दोन्ही परस्परविरोधी तक्रारींवरून जामखेड पोलिसांनी दोन्ही बाजूंचे गुन्हे दाखल केले असून तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर करत आहेत.

## 'दैनिक अक्षराज बातमी' चा इम्पॅक्ट !
### राजु मोरे यांच्या दणक्यामुळे विंचूरमध्ये रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** दै.अक्षराजने वृत्त प्रसिद्ध करताच बांधकाम विभागाची झोप उडाली ! विंचूर शहर आणि परिसरातील रस्त्यांवरील मोठमोठे खड्डे बुजविण्याचे काम अखेर सुरू झाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याने नागरिक त्रस्त होते. या पार्श्वभूमीवर विंचूर ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र मोरे यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग व पंचायत समितीकडे दुहेरी निवेदन सादर करून तातडीने दुरुस्तीची मागणी केली होती. अक्षराजने या समस्येवर ठळकपणे वृत्त प्रकाशित केल्यानंतर प्रशासनाने तत्काळ कारवाई करत श्रीराम चौक, विंचूर-निफाड मार्गावर खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले आहे. रोलर, जेसीबी आणि डांबर बाउजरच्या सहाय्याने रस्त्यांची दुरुस्ती युद्धपातळीवर सुरू आहे. कामाची पाहणी करण्यासाठी राजेंद्र मोरे, नानासाहेब जेऊघाले, दिलीप चव्हाण, इम्रान मोमिन, आदी ग्रामपंचायत सदस्य तसेच नागरिक उपस्थित होते.

विंचूर परिसरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम प्रशासनाने तातडीने सुरू केले आहे. श्रीराम चौक येथे अजूनही धुळीचे साम्राज्य असून तेथे तात्काळ सफाई करण्यात यावी ही विनंती आमच्या मागणीला सकारात्म क प्रतिसाद दिल्याबद्दल सर्व अधिकाऱ्यांचे व दैनिक अक्षराज वृत्तपत्राचे ही मनःपूर्वक आभार.
**– राजेंद्र मोरे, सदस्य, विंचूर ग्रामपंचायत**







## भारतीय वायू दल !



आज ८ ऑक्टोबर, दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय वायुसेना दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो. यावर्षी आपण आपला ९३ वा वायुसेना दिन साजरा करत आहोत. भारतीय वायू सेनेचे महत्व लोकांना कळावे आणि लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भारतीय वायुसेना ही भारतीय संरक्षण दलांच्या पाच मुख्य विभागांपैकी एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक म ानले जाते. ८ ऑक्टोबर, १९३२ रोजी भारतीय वायुसेनेची स्थापना युनायटेड किंगडमच्या रॉयल एअरफोर्स ची सहाय्यक कंपनी म्हणून करण्यात आली. भारतीय वायुसेनेने पहिले स्क्काड्रन तयार केले आणि ८ ऑक्टोबरला ते मिशन पूर्ण केले. त्यानंतर वायुसेनेने अनेक पराक्रम केले. अल्पावधीतच भारतीय वायुसेना जगातील सर्वात शक्तिशाली वायुसेना बनली. तेव्हापासून ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय नौसेना दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी हवाई दलात योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान केला जातो. यादिवशी भारतीय वायू सेनेकडून परेड, एअर शो सादर केले जातात. मागील वर्षी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या योद्ध्यांना या दिवशी पुरस्कार दिला जातो. त्यांचा यथायोग्य सन्मान केला जातो. सुब्रोतो मुखर्जी हे भारतीय वायू दलातील स्क्काड्रनचे पहिले प्रमुख होते. १२ मार्च १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एअर फोर्स झाले. सुरुवातीला भारतीय वायुदलाकडे खूप कमी विमाने आणि साधनसाम ग्री होती. १९४७ मध्ये विमानांना पिस्टनवर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा वेगवान जेट विमानांनी घेतली. प्रथम नॅट, हंटर, कॅनबेरा यासारखी ब्रिटिश बनावटीची विमाने वायुसेनेत सहभागी केली गेली. त्या नंतर तंत्रज्ञानाच्या कसोटीवर त्यांची जागा फ्रेंच बनावटीच्या विमानाने घेतली. भारतीय परराष्ट्र धोरणामुळे आणि रशियाने उत्तम सहकार्य केल्याने दणकट बनावटीची रशियन बनावटीची लढाऊ आणि मालवाहू विमाने सहभागी करण्यात आली. तसेच रशियन हेलिकॉफ्टर्स सहभागी करण्यात आली. सद्य काळात आधुनिक रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, दळणवळण यंत्रणा, नेटवर्क सेंट्रिक वॉरफेअर सी-४ आय ही संगणक प्रणाली वायुसेनेकडे आहेत. हवेतल्या हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने, विमानातून रडार वापरून दूर अंतरावरील शत्रूच्या विमानांची टेहळणी करणारी यंत्रणा, कक्षेबाहेरील शत्रूच्या ठिकाणाचा वेध घेणारी इत्यादी अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे सेनेत सहभागी करण्यात आली आहेत. आज भारतीय वायू दल जगातील सर्वात शक्तिशाली वायू दल समजले जाते. भारतीय वायू दल जातील चौथ्या क्रमांकाचे सामर्थ्यशाली वायू दल आहे. अमेरिका, रशिया आणि चीन पाठोपाठ भारताचेच वायू दल सर्वात मोठे वायू दल आहे. भारतीय वायू दलाची कामगिरी १४५ कोटी भारतीयांना अभिमान वाटावी अशी दैदिप्यमान आहे. ज्या ज्या वेळी देशाकडे शत्रूने वाकड्या नजरेने पाहिले त्या त्या वेळी भारतीय वायू दलाने उत्तुंग कामगिरी करून शत्रू राष्ट्राला दाती तृण धरायला लावले. १९४७/४८, १९६२, १९६५, १९७१, १९९९ साली झालेले कारगिल युद्ध किंवा नुकतीच झालेली ऑपरेशन सिन्दुर मोहीम या सर्व युद्धात भारतीय वायू दलाने महत्वाची भूमिका बजावली.

भारतीय वायू दल हा भारतीय संरक्षण दलाचा मानबिंदू आहे. भारतीय वायू दल दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त




अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले. त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज पुण्यतिथी.

गुरुदत्तजींच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख.

गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्म क चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्म कता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात.

त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो.

९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते .



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली.

अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

**रहनेको सदा दहरमे आता नही कोई**
**तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई**
**एक बार तो मौत भी घबरा गई होगी**
**यू मौत को सिने से लगाता नहीं कोई**

# दिबांचे नाव देण्यात गाडे कुठे अडते आहे...?

मोठ्या दिमाखात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विम ानतळाचे बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केले. दृष्ट लागावा असा हा उद्घाटन सोहळा झाला. या विमानतळामुळे नवी मुंबईचे महत्त्व प्रचंड वाढले आहे, शिवाय मुंबईच्या विमानतळाला पर्याय उभा राहिल्याने मुंबईवरील ताणदेखील कमी पडणार आहे. त्यामुळे या विमानतळाचे सर्वांनीच स्वागत केले आहे. जवळपास तीन दशकांपासून या विमानतळाची चर्चा होती.

सुरुवातीला याचा पनवेल विमानतळ असा उल्लेख केला जात असे. त्यानंतर नवी मुंबई विमानतळ असा उल्लेख झाला. मात्र, या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची स्थानिकांची मागणी आहे. पाच वर्षांपासून त्यासाठी नवी मुंबई, उरण, पनवेल तसेच ठाणे, पालघरमधील आगरी-कोळी आणि ओबीसी समाज संघर्ष करत आहे. त्यामुळे विमानतळ उद्घाटन सोहळ्यात विमानतळाला दिबांचे नाव केव्हा देणार, याची सर्वांना उत्सुकता लागली होती. मात्र, दुर्दैवाने म हाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार तसेच हवाई नागरी उड्डाणमंत्री राम मोहन नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ या सर्वांना लोकनेते दि. बा. पाटील यांचा विसर पडल्याचे दिसून आले. ज्या नेत्याचे नाव देण्याची म ागणी पाच वर्षे होत आहे, ज्यासाठी आंदोलन होत आहे, सरकार सकारात्मक आहे असे दाखवते तरीही त्यांचा उल्लेखदेखील महाराष्ट्रातील नेत्यांनी केला नाही, हे नक्कीच भूषणावह नाही.

दि.बा.पाटील यांच्यामुळे महाराष्ट्रात साडेबारा टक्के धोरण मंजूर झाले. शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात त्यांना साडेबारा टक्के भूखंड देण्यासाठी दि. बा. पाटील यांनी लढा उभारला होता. सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईची पायाभरणी होत असताना



प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिबांनी दिलेला लढा ऐतिहासिक आणि निर्णायक होता. त्याकाळी सिडकोने शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्यानंतर योग्य मोबदला दिला नव्हता. याविरोधात ठाणे जिल्हा, पनवेल आणि उरण तालुक्यातील स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती. या संतापाला दिबांनी योग्य दिशा देऊन लढा उभारला होता. या लढ्यात पाच शेतकऱ्यांना हौतात्म्य पत्करावे लागले होते. अत्यंत अभ्यासू, स्पष्ट वक्ते आणि मुख्य म्हणजे भ्रष्टाचारापासून दूर अशी दि. बा. पाटील यांची प्रतिमा होती. त्यांनी आयुष्यभर प्रकल्पग्रस्त, शेतकरी, कष्टकरी आगरी आणि कोळी समाजाच्या तसेच ओबीसींच्या हक्कांसाठी आयुष्य वेचले. त्यामुळेच नवी मुंबई आकारास येत असताना स्थानिकांना त्यांचे




हक्क मिळवून देण्यात, त्यांना ताठ मानेने जगवण्यात दिबांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. दि. बा. पाटील आमदार, खासदार होते. मात्र, त्यांनी कधीही स्वहित पाहिले नाही. साधी राहणी आणि उच्च विचाराचे ते नेते होते. म्हणूनच त्यांना लोकनेते म्हटले जाते. अशा या लढवय्या नेत्याचे नाव नवी मुंबई विमानतळाला द्यावे, अशी मागणी अनेक वर्षे होत आहे.

वशेष म्हणजे महाविकास आघाडीचे सरकार जाता जाता त्यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाला मंजुरी दिली तर त्यानंतर जून २०२२ मध्ये आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारनेही दिबांच्या नावाला मंजुरी देत केंद्राकडे प्रस्ताव पाठवला होता. म्हणजे केंद्र सरकारकडे सव्वा तीन वर्षांपासून दिबांच्या नावाचा प्रस्ताव आहे. तरीही त्यांनी सरकार सकारात्मक आहे, एवढेच उत्तर दिले आहे. विशेष म्हणजे ३ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघर्ष कृती समितीला तीन म हिन्यांत दिबांचे नाव देण्याची ग्वाही दिली. काही तांत्रिक कारणामुळे तीन महिने लागतील, असे मुख्यमंत्र्यांनी संघर्ष समितीला सांगितले आणि त्यावर सर्वांनी विश्वास ठेवला. मात्र, विमानतळाचे उद्घाटन होताना कुणीही दि. बा. पाटील यांचा उल्लेखही केला नाही. या संपूर्ण कार्यक्रमात उल्लेखनीय बाब म्हणजे एकट्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचा आदराने उल्लेख केला. महाराष्ट्र पुत्र लोकनेते दि. बा. पाटील यांची आठवण काढत त्यांनी समाज आणि शेतकऱ्यांसाठी सेवाभावाने काम केल्याचे कौतुक केले.

मात्र, त्यांनीही विमानतळाला दिबांचे नाव देण्याबाबत काहीही उल्लेख केला नाही. एकूणच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटनाच्या कार्यक्रमात दिबांचा विसर पडल्याने स्थानिकांचा संताप आता अनावर झाला आहे. सरकारने किमान दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला केव्हा दिले जाईल, हे सांगायला हवे होते. मात्र, ज्या भूमीत आले त्याच भूमीच्या नायकाचा सर्वांना विसर पडला. यामुळे स्थानिक दुखावले गेले आहेत. कार्यक्रमानंतर याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. राज्य आणि केंद्र सरकार लोकभावनेशी खेळत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. याकडे सरकारने गांभीर्याने पाहायला हवे. दिबांचे नाव विमानतळाला देण्यासाठी पाच वर्षे संघर्ष सुरू आहे. प्रत्यक्षात सव्वा तीन वर्षांपासून सकारात्मक आहोत, असे सरकार सांगते. मग नाव देण्यात दिरंगाई का, , याचे उत्तर दिले जात नाही आणि उद्घाटनाची तारीख जवळ आल्यानंतर तांत्रिक कारणामुळे तीन महिने लागतील, असे मुख्यमंत्री संघर्ष समितीला सांगत असतील तर यातून काय मेसेज लोकांपर्यंत जातो, याचा सरकारने विचार करण्याची गरज आहे. इतका भव्यदिव्य उद्घाटन समारंभ होऊनही नवी मुंबई विमानतळाला दि.बां.पाटलाचं नाव देण्यात गाडे कुठे अडते आहे....?

## औषधसंहिता

हवे कशाला डॉक्टर
रे सर्दी पडशा करता
दवाखान्यात जायचे
भलता आग्रह धरता

पाळत नाही आपण
कधी औषध संहिता
मनाने घेऊन औषधे
बाधा आणतो हिता

जुन्याप्रिस्किप्शनवर
कशीही औषधे घेता
दोष आजार पणाचा
अवघ्या जगांला देता

डॉक्टरां पेक्षा विद्वान
बरा मेडिसिनविक्रेता
हवेत असे गि-हाईक
आपणांसारखा क्रेता

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

फी वाचवावी वैद्यांची
त्रास नको तो नसता
असाचं हवा जादुगार
ऋग्णांस ना तपासता

एक्सपायरी डेट काय
कशास उगाचं पाहता
नंतर सोसत बसायचे
रे रिॲक्शनची दाहता

चिंता वाढवी सर्वांची
वैद्यकीय खर्च वाढता
निर्माण होतात बवाल
विचित्र कुठेही घडता

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# जुन्या वादातून दोन गटांमध्ये तुफान राडा! मंदिरात दर्शनासाठी आलेल्या सतीशचा मत्यू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यात काही वेळापासून अपराधांचे सत्र सुरूच आहे. मागील काही महिन्यातच शेतीच्या बादावरून वृद्ध शेतकऱ्याची हत्या करणे,एकतर्फी प्रेमातून युवकाला संपवणे, असे प्रकार सुरूच आहेत. त्याचबरोबर, जिल्ह्यातील खाम गाव येथील जुगनू ढाब्यावर चाकूने वार करून डबल मर्डरचा धक्कादायक प्रकारही समोर आला होता. ही घटना ताजी असतानाच, पुन्हा एकदा मलकापूरात घडलेल्या घटनेने जिल्हा स्तब्ध झाला आहे.

मलकापूरमध्ये जुन्या वादातून चाकूहल्ला

या परिसरात जुन्या वादातून दोघांवरती चाकू हल्ला केल्याची घटना घडली आहे. त्यामधील एक जण गंभीर जखमी झाला असून, दुसऱ्याचा मृत्यू झाला आहे. जुन्या वादाला नवीन पेट देत मलकापूर येथे सोमवारी (६ ऑक्टोबर) सायंकाळी धोपेश्वर परिसरात दोन गटांमध्ये हाणामारी झाली. यामध्ये




चाकूहल्ला होऊन पिंप्राळा (ता. मुक्ताईनगर) येथील सतीश गजानन झाल्टे (वय २१) याचा मृत्यू झाला असून अविनाश जितेंद्र झाल्टे (वय २३) गंभीर जखमी झाला आहे. ही घटना घडताच परिसरात मोठा तणाव निर्माण झाला असून संतप्त नागरिकांनी हल्लेखोरांना पकडून बेदम मारहाण केली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन आरोपींना ताब्यात घेतले आहे.

**जुन्या वादावरून मारहाण !**

प्राथमिक माहितीनुसार, सतीश आणि अविनाश यांचा काही दिवसांपूर्वी मलकापूर येथील काही युवकांशी धोंगर्डी फाट्यावर वाद झाला होता. सोम वारी सायंकाळी हे दोघे धोपेश्वर मंदिरात दर्शनासाठी आले होते. मंदिराजवळील एका हॉटेलमध्ये ते चहा घेत असताना मलकापूर मधील वादग्रस्त युवक त्या ठिकाणी आले

जुन्या वादावरून वाद पुन्हा उफाळून निघाला आणि पाहता-पाहता त्यांच्यामध्ये हाणामारी सुरू झाली. त्यात एका गटाकडून चाकूहल्ला करण्यात आला.या हल्ल्यात सतीश झाल्टे आणि अविनाश झाल्टे गंभीर जखमी झाले. सतीशला तातडीने मलकापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. तसे, अविनाश झाल्टे याच्यावर जळगाव येथील खानदेश रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची परिस्थिती स्थिरावली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## खा.धानोरकर यांचा चंद्रपूर मनपाला ‘अल्टिमेटम’;

### ‘जीवघेणे’ रस्ते दुरुस्ती न झाल्यास ‘गिट्टी फेक’ आंदोलन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** शहरातील रस्त्यांच्या दयनीय आणि जीवघेण्या अवस्थेवरुन चंद्रपूर शहर महानगरपालिका (मनपा) प्रशासनाला तीव्र शब्दात इशारा दिला आहे. शहरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी खा. प्रतिभा धानोरकर यांनी मनपा आयुक्तांना थेट ५ (पाच) दिवसांचे ’अल्टिमेटम’ दिले असून या निर्धारित वेळेत काम न झाल्यास, मनपाच्या निष्क्रियतेविरोधात महानगरपालिकेच्या प्रांगणातच ’गिट्टी फेक’ आंदोलन सुरु करण्याचा इशारा दिला आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांनी आयुक्तांना पाठविलेल्या पत्रामध्ये रस्त्यांच्या दुरावस्थेवर प्रकाश टाकला आहे. चंद्रपूर शहरातील मुख्य रस्त्यांपासून अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. जागोजागी पडलेले मोठमोठे खड्डे, उखडलेला डांबर आणि निकृष्ट दर्जाचे काम यामुळे सामान्य नाहरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांवरुन ये-जा करणे आता नागरिकांसाठी मोठी अडचण आणि ’जीवघेणी बाब’ बनली आहे. विद्यार्थ्यांपासून ते वयोवृध्दांपर्यंत सर्वांनाच याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, रस्त्यावर अपघात झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी तात्काळ रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मनपा आयुक्तांना स्पष्टपणे कळविले आहे की, चंद्रपूर शहरातील रस्त्यांची दुरुस्ती ५ दिवसांच्या आत पूर्ण न झाल्यास, चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या निष्क्रियतेचा तीव्र निषेध करण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रांगणात ’ गिट्टी फेक’ आंदोलन सुरु करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## मेडिकल विद्यार्थिनी लेकीने खोलीत आयुष्य संपवलं



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, सोलापूर :** सोलापूर शहरात एक धक्कादायक घटना घडली आहे. शहरातील जुळे सोलापूर भागातील एका उच्चभ्रू सोसायटीत वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवार ७ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास घडली आहे.

सोलापूर मधील डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तिसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या २५ वर्षीय साक्षी सुरेश मैलापुरे हिने अज्ञात कारणामुळे गळफास घेऊन आत्महत्या केली. सोलापूर शहरातील विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिस तपास करत आहेत. पोलिस साक्षीचा मोबाईल जप्त करणार असून त्यामधून अधिकची माहिती समोर येईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. आईला वाटत होतं, मुलगी अभ्यास करत आहे. साक्षी मैलापूरे ही मंगळवारी सकाळी अभ्यास करण्यासाठी आतल्या खोलीत गेली होती. बराच वेळ झाला आतून बाहेर आली नाही. तिच्या आईने दरवाजा ठोठावला पण आतून काहीही आवाज आला नाही. तिच्या मोबाईलवर कॉल करूनही ती उचलत नव्हती. त्यावेळी घाबरलेल्या तिच्या आईने नातेवाईकांना व शेजारच्यांना बोलावून घेतले.दरवाजा उघडताच साक्षीने खोलीतील पंख्याच्या हुकला स्कार्फने गळफास घेतल्याचे दिसले. गळफास घेतलेल्या अवस्थेत पाहून आईच्या पायाखालची जमीन सरकली. नातेवाईकांनी व शेजाऱ्यांनी साक्षीला बेशुद्धावस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## सेवाभावी सामाजिक संस्थांनी पुढे येऊन पूरग्रस्त भागात मदतीचा हात द्यावा - मंत्री तटकरे

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, ठाणे :** मराठवाड्यासह राज्यातील काही भागांमध्ये पूरस्थितीत महिलांच्या आरोग्याच्या गरजांचा विचार करून त्यांच्यासाठी वैयक्तिक स्तरावर ५ लाख सॅनिटरी पॅडचे वितरण करण्यात आले आहे. तसेच सक्षम फाउंडेशनतर्फे आणखी १० हजार सॅनिटरी पॅड पूरबाधित महिलांना देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. पुरामुळे अनेक कुटुंबांचे जगणे विस्कळीत झाले आहे. शासनामार्फत अन्न, वस्त्र व आर्थिक साहाय्य दिले जात असले तरी महिलांच्या आरोग्याशी निगडित सॅनिटरी नॅपकीनसारख्या मूलभूत गरजाही पूर्ण करण्यात येत आहेत. राज्यातील पूरग्रस्तभागातील ८ ते ९ जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा नियोजनाच्या राखीव निधीतून सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## चंद्रपूर जिल्ह्यातील प्रश्नांसाठी आ.मुनगंटीवारांनी घेतली महसूल प्रधान सचिवांची भेट

### कोठारी येथे अतिरिक्त तहसिलदार कार्यालयाच्या पदभरतीची मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी महसूल विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांची मुंबई येथे भेट घेऊन चंद्रपूर जिल्ह्यातील प्रलंबित महसूल विषयांवर सविस्तर चर्चा केली. दोन दिवसांपूर्वीच केंद्रीय रेल्वे मंत्री ना.अश्विनी वैष्णव यांना भेटून चंद्रपूर जिल्ह्यातील विविध मुद्यांसंदर्भात आ.मुनगंटीवार यांनी निवेदन दिले. त्यानंतर आता महसूल प्रश्नांसंदर्भात प्रधान सचिवांची त्यांनी भेट घेतली.

यावरून जिल्ह्यातील सर्व क्षेत्रांतील प्रश्न निकाली लावण्यासाठी आ. मुनगंटीवार सातत्याने प्रयत्नशील असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. विकास खारगे यांच्यासोबत झालेल्या भेटीत आ. मुनगंटीवार यांनी कोठारी येथे मंजूर झालेल्या अतिरिक्त तहसिलदार कार्यालयाच्या पदभरतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली.

जिल्ह्यातील महसूल प्रशासन अधिक सक्षम व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने ही पदभरती अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच जिल्ह्यातील ५२ तलाठी कार्यालयांमध्ये सुरू असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत, अशी सूचनाही त्यांनी केली. नागरिकांच्या दैनंदिन कामासंदर्भात निगडित असलेली ही कार्यालये प्रभावीपणे कार्यरत राहण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, तांत्रिक साधनसामग्री आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकडे आ. मुनगंटीवार यांनी लक्ष वेधले. महसूल विभागाच्या विविध प्रलंबित विषयांबाबत सखोल आढावा घेण्यासाठी विकास खारगे यांनी स्वतः चंद्रपूर जिल्ह्याचा दौरा करावा, अशी विनंतीही आ. मुनगंटीवार यांनी या भेटीत केली. या दौऱ्यात स्थानिक अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा होईल व जिल्ह्यातील महसूल विषयक प्रश्नांना गती मिळेल, असा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. या भेटी दरम्यान महसूल विभागाच्या संबंधित विविध विषयांवरही चर्चा झाली.

## पनवेल मनपा अभय योजना; १५ ऑक्टोंबर पर्यंत ७५ टक्के सुट




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, पनवेल :** महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी ‘अभय योजना’ राबविण्यात येत आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार १५ ऑक्टोंबर पर्यंत शास्तीवरती ७५ टक्के सुट देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. या अभय योजनेचा मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. अभय योजनेंतर्गत आत्तापर्यंत सवलतीसह ५६६ कोटींचा कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

याआधी महापालिकेने करदात्यांना शास्तीमध्ये तब्बल ९० टक्के सवलत होती. त्यानंतर आता १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्यांना ७५ टक्के शास्ती माफी मिळणार आहे. महापालिकेकडून नागरिकांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन देण्यात आले आहे. करदात्यांनी ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यामुळे थेट २ टक्के सवलत मिळू शकते. तसेच ऊर्जा बचत करणारे सौर पॅनल, शेड नेट, वॉटर हार्वेस्टिंग अशा उपाययोजना केल्यास करामध्ये २ टक्के सवलत दिली जाणार आहे. याशिवाय घनकचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट करणाऱ्या सोसायट्यांना नियमानुसार करात २ टक्के सवलत मिळणार आहे. कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महापालिकेचे panvelmc.org हे संकेतस्थळ तसेच PMC TAX APP आणि Panvel Connect App उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे करदात्यांना घरबसल्या ऑनलाईन कर भरण्याची सुविधा मिळत आहे.

महापालिकेच्या वतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, ही अंतिम मुदतवाढ लक्षात घेऊन दिलेल्या शास्तीमाफी व सवलतींचा लाभ घ्यावा.

कर-मित्र’ चॅटबॉटची सेवा सुरूनागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगर पालिकेने ‘कर-मित्र’ चॅटबॉट सेवा सुरू केली आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवितो आहे. कर-मित्र चॅटबॉट द्वारे नागरिकांना खालील सेवा उपलब्ध होतील: मालमत्ता कराची थकबाकी त्वरित जाणून घेणे. आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून थेट कर भरता येणे. बिल, पावती व कर गणनेबाबत शंका निरसन. योजना, सवलत आणि अंतिम तारखांबाबत अद्ययावत माहिती.अधिक मदतीसाठी नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाइटवरील ‘कर-मित्र’ चॅटबॉट चा वापर करावा.

आतापर्यंत मालमत्ता कर भरलेल्या मालमत्ता : ९५ हजार ७८ अभय योजनेचे लाभार्थी : ६० हजार २१३ शास्ती माफ झालेली रक्कम : ११७ कोटी

## राज्य उत्पादन शुल्क कार्यालयामार्फत छाप्यातून १३ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, बुलडाणा :** जिल्ह्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत जिल्ह्यात अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी कारवाईचे सत्र सुरु आहे. याअंतर्गत २ ते ८ ऑक्टोबर या महात्मा गांधी सप्ताहाच्या कालावधीत जिल्ह्यातील हातभट्टी, अवैध मद्यविक्री केंद्रावर एकूण ९४ ठिकाणी छापे घालून गुन्हे नोंदविण्यात आले असून ९७ आरोपींना अटक केली आहे.

या गुन्ह्यात एकूण ७ वाहने आणि १३ लाख ६५ हजार ४२८ रुपये इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती प्र. विभागीय उप-आयुक्त डॉ. पराग नवलकर यांनी दिली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात ही कारवाईचे सत्र सुरु आहे. ही कारवाई बुलढाणा जिल्ह्यातील मौजे पांगरी उबरहंडे, उंबरखेड, भादोला, आंबेडकर नगर, बुलढाणा, देऊळगाव धनगर, तुळजापूर, लोणी गवळी, अंजणी बु. अंबाशी, धोडप, खिरोडा, शेगाव, बेलखेड, कवठळ, मचिंदरखेड, पातुर्डा फाटा, मेहकर, लोणार, सुलतानपूर, देऊळगाव माळी इत्यादी ठिकाणी छापे टाकून करण्यात आली आहे. या कारवाईत जिल्ह्यातील सर्व निरीक्षक, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क व त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचा सहभाग होता.

अवैध मद्य विक्री व निर्मिती विरोधी विशेष मोहीम बुलढाणा जिल्ह्यात अवैध दारु विक्री केंद्र, गावठी हातभटटी विक्री केंद्रांविरोधात व अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी कार्यक्षेत्रीय निरीक्षक राज्य शुल्क, बुलढाणा, खामगाव, देऊळगाव राजा व निरीक्षक भरारी पथक बुलढाणा यांच्या नियंत्रणाखालील विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील अवैध मद्य विक्री व निर्मिती विरोधी विशेष मोहिमेत २५ ठिकाणी छापे टाकून जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. अवैध मद्यविक्रीच्या माहिती देण्यासाठी टोल फ्री क्रमांकावर संपर्क कराअवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, धाब्यांबाबत अवैध मद्य निर्मिती व वाहतुकीबाबत माहिती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ वर किंवा व्हॉटसअ‍ॅप क्रमांक ८४२२००११३३ यावर किंवा excisesuvidha. mahaonline.gov.in या पोर्टलवर तत्काळ कळविण्याचे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

## पंचायत समिती सभापती पदाची जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत जाहीर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, वाशिम :** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-व असाधारण क्रमांक ३१७ दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ अन्वये महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाने क्रमांक/जिपनि २०२५/प्र.क्र.१२ज/पंरा-२, दि. ९ सप्टेंबर, २०२५ रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-व असाधारण क्रमांक ३१७ दिनांक ९ सप्टेंबर २०२५ मधील ग्राम विकास विभागाची अधिसूचना क्रमांक/जिपनि-२०२५/प्र.क्र.१२ज/पंरा-२, दिनांक ९ सप्टेंबर, २०२५ नुसार वाशिम जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील सहा पंचायत समित्यांचे सभापती पदाचे आरक्षण अडीच वर्षांच्या कालावधीकरिता खालील प्रवर्गानुसार निश्चित करण्यात आले.

वाशिम जिल्ह्यातील ६ पंचायत समितीच्या सभापती पदासाठी अनुसूचित जाती महिला राखीव १, नागरिकांचा मागास प्रवर्ग १, महिला राखीव १, सर्व साधारण २, महिला राखीव १ आरक्षण निश्चित करण्यासाठी आरक्षण सोडत गुरूवार, दि.९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता, नियोजन भवन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे विशेष सभा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. यावेळी उपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र जाधव उपस्थित होते.पंचायत समिती सभापती आरक्षण संदर्भात आरक्षणाचा पहिला प्रकार अनुसूचित जाती (महिला) या पदाचे आरक्षण यामध्ये सर्वात पुर्वी अनुसूचित जाती आरक्षण




निघालेली पंचायत समिती मानोरा आहे. २००३ ते २००६ त्यामुळे सदर अनुसूचित जाती महिला आरक्षण निश्चित झाले.पंचायत समिती सभापती आरक्षण संदर्भात आरक्षणाचा दुसरा प्रकार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग या पदाचे आरक्षण ग्रामविकास विभाग यांची अधिसूचना असाधारण क्रमांक ३१७ मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५ अन्वये निश्चित करून देण्यात आलेल्या आरक्षणापैकी नामाप्र (सर्वसाधारण) १ जागा, नामाप्र (महिला) १ जागा, यापूर्वी पंचायत समिती वाशिम, मानोरा, मालेगाव यामध्ये नामाप्र आरक्षण असून त्यापैकी मानोरा (अ.जा महिला) निश्चित झालेली आहे. त्याआधी २०१६ ते २०१८ मध्ये रिसोड व कारंजा नामाप्र साठी राखीव होते. त्यापैकी अजून मागे कारंजा नामाप्र आरक्षण २००८ - २०११ मध्ये होते. रिसोड नामाप्र आरक्षण २००६-२००८ मध्ये होते. म्हणून कारंजा व रिसोड पैकी रिसोड मध्ये नामाप्र आरक्षण निश्चित होते. दुसरे नामाप्र आरक्षण मंगरूळपीर मध्ये निश्चित झाले.नामाप्र आरक्षण मंगरूळपीर व रिसोड यामध्ये यापूर्वीचे नामाप्र महिला आरक्षण विचारात घेतले असता मंगरूळपीर नामाप्र महिला २००८ ते २०११ आणि रिसोड नामाप्र महिला २००६ ते २००८ अशी आहे.त्यामुळे रिसोड नामाप्र महिला आरक्षण निश्चित होते. मंगरूळपीर नामाप्र सर्वसाधारण निश्चित झाले.प्रवर्ग सर्वसाधारण एकुण ३ जागा त्यापैकी सर्वसाधारण महिला १, सर्वसाधारण २ उर्वरित पंचायत समिती वाशिम, मालेगाव, कारंजा यापैकी मालेगाव सर्वसाधारण महिला आरक्षण २०२२ ते २०२५ , कारंजा सर्वसाधारण महिला आरक्षण २०२० ते २०२२ आणि वाशिम सर्वसाधारण महिला आरक्षण २००६ ते २००८ असे आहे.त्यामुळे सर्वसाधारण महिला आरक्षण वाशिम पंचायत समिती सर्वसाधारण (महिला), मालेगाव सर्वसाधारण आणि कारंजा सर्वसाधारण निश्चित करण्यात आले आहे. या आरक्षण सोडतीला नागरिक, पत्रकार, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष होण्यासाठी अजितदादा पवार यांचा भ्रष्टाचारास पाठबळ - पै.भोंडवे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, पुणे :** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकीमध्ये अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. वास्तविक भारतीय ऑलिंपिक असोसिएशनच्या घटनेनुसार व नव्याने मंजुर झालेल्या स्पोर्ट्स कोड नुसार ३ टर्म अध्यक्षपद भुषवल्यानंतर आपणास ४ थ्या टर्मला अध्यक्ष होता येत नाही. परंतु सगळे नियम धुडकावत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला.

विशेष म्हणजे महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या घटनेमध्ये सुध्दा ३ टर्म नंतर अध्यक्ष होता येणार नाही असेच होते. परंतु मागे महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या कार्यकारणीस अंधारात ठेऊन महासचिवांनी घटनेमध्ये बदल करुन तो क्लॉज काढुन टाकला होता. परंतु भारतीय ऑलिंपिक असोसिएशनच्या नियमानुसार हे कृत्य बेकायदेशीर ठरण्याची शक्यता आहे.

**बेकायदेशीरपणे काही संघटनांना मतदानाचे अधिकार**

महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकीमध्ये कोणत्या नियमाने राज्य खेळ संघटनेस मतदानाचे अधिकार असावेत हे जाणुन बुजून निश्चित केले नसल्याने यामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. ज्या संघटनेत वादविवाद आहेत व प्रशासक नेमले आहेत जसे की कबड्डी, नेटबॉल, हॅन्डबॉल, तायक्कांदो यांना नियम डावलुन मतदान प्रक्रियेत सामावून घेतले आहेत. तर जलतरण, कराटे अशा काही संघटनांना निवडणुक प्रक्रियेतुन बाहेर ठेवण्यात आल्याने ही निवडणूक प्रक्रियेवर अनेक राज्य खेळ संघटनांनी नाराजी व्यक्त करत कोर्टाचे दरवाजे ठोठावण्याची तयारी केली आहे.

ही निवडणुक पुण्यामध्ये होणार असल्याचे जाहीर केले असताना अचानकपणे परीपत्रक काढुन मुंबई हे निवडणुकीचे ठीकाण निश्चित केल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

**भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन व उपोषण**

३ नॅशनल गेम्स करीता शासनाकडुन देण्यात आलेला १२ कोटी ४५ लाख रुपये निधीचा हीशोब महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने शासनास सादर न केल्याने व त्या अनुदानामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला असल्याची खात्री असल्याने दिनांक २३ सप्टेंबर रोजी पुणे येथे माजी खासदार रामदासभाऊ तडस यांच्या नेतृत्वाखालील आंदोलन घेण्यात आले होते.

तसेच भारतीय जनता पार्टी क्रीडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीप भोंडवे यांनी ४ दिवस आमरण उपोषण केले होते. त्यावेळी क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य यांनी ऑलिंपिक असोसिएशनला पत्र काढुन ७ दिवसामध्ये हिशोब सादर करा अन्यथा कारवाई करु असे पत्र काढण्यात आलेले होते. तर आर्थिक गुन्हे अन्वेषण चे सहाय्यक आयुक्त विवेक मासाळ यांनी तात्काळ भ्रष्टाचाराची चौकशी सुरु करु असे आश्वासन दिले होते.

**अजितदादांचा भ्रष्टाचार प्रकरण दाबण्याचा प्रयत्न**

दिनांक २९ सप्टेंबर रोजी मा.अजितदादा पवार यांनी मुंबई येथील त्यांच्या दालनात महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. त्या बैठकीमध्ये चर्चे दरम्यान त्यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त विवेक मासाळ यांना फोन करुन संबंधित तपास सुरु करण्याअगोदर माझी भेट घे असे जाहीरपणे सांगितले.

यामुळे पोलीस प्रशासनाचा तपास संथ झाला आहे. तसेच आयुक्त क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य यांनी हिशोब न आल्यानंतर प्रत्यक्ष कारवाई करण्याऐवजी क्रीडा मंत्रालयात पत्रव्यवहार करुन कारवाईची गती संथ केली आहे. महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष अजितदादा पवार आहेत.

त्यामुळे ३ नॅशनल गेम्सकरीता घेतलेल्या १२ कोटी ४५ लाख रुपयांच्या हिशोबाची संपुर्ण जबाबदारी ही त्यांचीच आहे. २ ते ३ वर्ष होऊन सुध्दा अजून ही हिशोब सादर न झाल्याने यामध्ये भ्रष्टाचार झाला असल्याची जाणीव अजितदादांना झाली आहे. परंतु महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकीमध्ये पुन्हा अध्यक्ष होण्याची मनिषा घेऊन उतरलेल्या अजितदादांना स्वतः अध्यक्ष होण्यासाठी काही पदाधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचारास ते जाणीवपूर्वक पाठीशी घालण्याचा प्रयत्न करत असून हे भ्रष्टाचार प्रकरण ते दाबण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु तसे महाराष्ट्रातील खेळाडु व राज्य संघटना यांना न्याय देण्यासाठी वेळेप्रसंगी कोर्टाचे दरवाजे ठोठावले जातील असा इशारा भारतीय जनता पार्टी क्रीडा आघाडीचे अध्यक्ष पै.संदीप भोंडवे यांनी दिला आहे.

# चिखलीत जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक संपन्न

## उद्योजकांनी कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगाकडे वळावे जिल्हाधिकारी डॉ.पाटील यांचे आवाहन; एमआयडीसीतील समस्या व उपाययोजनांवर चर्चा




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, बुलडाणा :** जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक बुधवारी चिखली एमआयडीसीत संपन्न झाली. निर्यातीवर भर देत उद्योजकांनी कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगाकडे वळावे, असे आवाहन त्यांनी या बैठकीत केले.या बैठकीला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी गुठळे, तहसिलदार संतोष काकडे, जिल्हा अग्रणी बॅंकेचे व्यवस्थापक कोमलेंद्र कुमार सिंह, विविध विभाग व बॅंकांचे अधिकारी, असोशिएशनचे पदाधिकारी, निर्यातदार व उद्योजक उपस्थित होते.या जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी उद्योजकांसोबत संवाद साधून त्यांच्या प्रशासकीय स्तरावरील समस्या जाणून घेत उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. त्यात त्यांनी जिल्ह्याला एमआयडीसीचा स्वतंत्र अधिकारी असावा अशी मागणी शासनाला केली असल्याची माहिती दिली. तसेच एमआयडीसीतील विद्युत पुरवठ्याच्या समस्या सोडवण्यासाठी एक्सप्रेस फिडरची सुविधा उपलब्ध करावी. सुरक्षेसाठी सीसीटिव्ही, चौकी सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव सादर करावे. असोशिएशनचे कार्यालय कार्यान्वित करावे,अशा सूचना त्यांनी क दिल्या. निर्यात हे जिल्ह्याचे बलस्थान आहे. जिल्ह्यातून जास्तीत जास्त निर्यातीसाठी प्रयत्न करावे.

नव उद्योजकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध अनुदान योजना सुरु केल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यात कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग सुरु करावेत. नव युवकांनी योजनांचा लाभ घ्यावा. कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांना चालना द्यावी. त्यासाठी शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांना प्रोत्साहित करावे. जिल्हा प्रशासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहिल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सर्वप्रथम उद्योजकांना असोशिएशन मजबूत करा. औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांसदर्भात अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांना नियमित भेट देवून पाहणी करावी. उद्योजकांसमवेत चर्चा करुन नियमित आढावा घ्यावा. प्रशासकीय कार्यपद्धतीत बदल करावा, असे निर्देशही त्यांनी दिले. उद्योग सुरु करा, अन्यथा जागा खाली करानवीन प्लॉटची मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे. वर्षानुवर्ष ताब्यात घेतलेल्या एमआयडीसीच्या प्लॉटवर उद्योग सुरु करावाच लागेल, अन्यथा जागा खाली करावी लागेल, असा इशारा देखील जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी या बैठकीच्या माध्यमातून दिला.या बैठकीत अकोलाचे प्रादेशिक अधिकारी यांनी एमआयडीसीच्या सुविधा आणि योजनांची माहिती दिली. जिल्हाधिकाऱ्यांची पलसिद्ध प्रकल्पाला भेटचिखली एमआयडीसी परिसरातील पलसिद्ध प्रकल्पाला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, तहसिलदार संतोष काकडे, कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# थोडक्यात

## पं. स. सभापती आरक्षण सोडत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, अकोला :** जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या उपस्थितीत नियोजन भवनात गुरुवार, दिनांक ०९ ऑक्टोबर २०२५ रोजी काढण्यात आली.सोडतीनुसार पंचायत समितीनिहाय आरक्षण : बाळापूर - अनुसुचित जाती, अकोला - अनुसुचित जाती महिला, तेल्हारा - अनुसुचित जमाती महिला, अकोट- नागरिकांचा मागास प्रवर्ग, पातुर - सर्वसाधारण महिला, बार्शीटाकळी-नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, मुर्तिजापुर- सर्वसाधारण. निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांच्यासह राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्यांची अकोट भेट

### पाणंदरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासाठी मोहीम स्तरावर काम करा - जिल्हाधिकारी वर्षा मीना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, अकोला :** नागरिकांचे प्रलंबित प्रश्न सुटावेत व त्यांना उत्तम सेवा मिळावी यासाठी सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम केवळ या कालावधीपुरता मर्यादित न राहता सातत्यपूर्ण कार्य करावे. पानंदरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासाठी स्तरावर काम करावे असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अकोट येथे दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी तहसील कार्यालय अकोट व उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोट येथे भेट देऊन कार्यालयाची पाहणी केली. कार्यालयामध्ये नागरिकांच्या माहितीसाठी लावण्यात आलेले विविध क्यू आर तसेच इतर माहिती फलक याबाबत पाहणी करून माहिती जाणून घेतली. त्याचप्रमाणे सेवा पंधरवड्यामध्ये केलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व तालुकास्तरीय व उपविभाग स्तरीय अधिकारी यांची आढावा सभा घेऊन त्यांच्या विभागामार्फत केल्या जाणाऱ्या विविध कामकाजाची माहिती घेतली, तसेच ग्रामीण रुग्णालय अकोट येथे भेट देऊन रुग्णालय मार्फत नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या विविध वैद्यकीय सेवांची पाहणी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी अकोट यांचे कार्यालयात भेट देऊन नगरपरिषद कामकाजाबाबत आढावा घेतला. नगरपरिषद मार्फत नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या अत्यावश्यक सेवा योग्य दर्जाचे असाव्यात तसेच शहराचे सौंदर्यीकरण करण्याबाबत निर्देश दिले. त्यांनी मौजे जीतापूर येथील स्वयंचलित पर्जन्यमापक यंत्र चे ठिकाणी भेट देऊन पाहणी केली व परिसरातील शेतकऱ्यांच्या याबाबत असलेल्या तक्रारी जाणून त्या सोडवण्याचे निर्देश दिले. जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी मौजे बोर्डी येथे जनसंवाद कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी व समस्या जाणून घेतल्या व सदर समस्या सोडविण्यासाठी संबंधित सर्व विभागांचे अधिकारी यांना निर्देश दिले.

## अध्ययन एम.एस.डब्लू. विद्यार्थिनीच्या ग्रामीण अभ्यास शिबिराचे आयोजन

**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.०९, चिंतलधाबा (चंद्रपूर) :** एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ चर्चगेट मुंबई येथील समाजकार्य विभागात अध्ययन नस्त एम.एस.डब्लू. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनीच्या अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे ग्रामीण अभ्यास शिबिर. सदर शिबिराचे आयोजन दिनांक ०९ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत चिंतलधाबा येथे करण्यात येणार आहे. या शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनाशी सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक रचना प्रत्यक्ष अनुभवातून समजून देणे स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य गाव पातळीवरील प्रशासन व विकास प्रक्रिया याविषयी आकलन निर्माण करणे असा आहे. शिबिराच्या कालावधीत विद्यार्थिनी विविध क्षत्रिय उपक्रम सर्वेक्षण जनजागृती कार्यक्रम गटचर्चा तसेच गावकऱ्यांशी संवाद यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. सदर उपक्रम गावातील सामाजिक व सांस्कृतिक परंपराचा आदर राखून राबवले जातील शिबिर कालावधीत संपूर्ण समन्वय ग्रामपंचायत व स्थानिक नागरिकांशी ठेवण्यात येईल. अशी माहिती आयोजांकडून देण्यात आली.

# अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांविषयी शासन संवदेनशील

## येणारा निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावा - पालकमंत्री देसाई



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, सातारा :** अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांविषयी शानसन अत्यंत संवदेनशील आहे. बाधित शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदत राज्य शासनाकडून करण्यात येणार आहे. मदतीचा निधी येताच त्वरीत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा. एकही बाधित मदतीपासून वंचित राहू नये याची दक्षता घ्यावी, खरवडून गेलेल्या जमिनी आणि गाळ भरलेल्या विहिरी यांचे ही पंचनामे करावेत. नुकसान झालेल्या व आराखड्यामध्ये समाविष्ठ न झालेल्या बाबींची पुरवनी यादी शासनाला त्वरीत पाठवावी, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात सातारा जिल्ह्यातील अतिवृष्टी व नुकसान भरपाईबाबत पालकमंत्री श्री.देसाई यांनी आढावा घेतला.

या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, अप्पर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभय काटकर, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना मदतीचे आर्थिक पॅकेज जाहीर करत आहे, असे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, या पॅकेजनुसार शासनाकडून प्रत्येक जिल्ह्याला निधी वर्ग केला जाणार आहे. निधी येताच दिवाळीपूर्वी बाधितांच्या खात्यावर जमा करावे. अतिवृष्टी बाधितामध्ये ज्यांच्या पिकाचे, जमिनीचे, विहिरींचे नुकसान तसेच जनावरांचा मृत्यु झाला आहे अशांना मदत दिली जाणार आहे. मदतीपासून एकही बाधित वंचित राहणार नाही याची महसूल व कृषी विभागाने याची दक्षता घ्यावी.

सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टी बाधित कोरेगाव, माण, खटाव व सातारा तालुक्यातील एकूण २९४ घरांची अंशत: पडझड झाली आहे. नुकसानिपोटी तहसील स्तरावरुन निधी वितरण करण्यात आला आहे. खटाव तालुक्यातील मयत व्यक्तीला ४ लाख मदत वाटप करण्यात आली आहे. तसेच सातारा तालुक्यातील मयत व्यक्तीच्या वारसास आर्थिक मदत करण्याची कार्यवाही सुरु आहे. मयत पशुधनाची संख्या ४ असून ३६ दुकाने बाधित झाले आहेत. यांच्यासाठीही तहसीलस्तरावरुन मदत वाटप सुरु आहे.तसेच कोरेगाव, खटाव, कराड, वाई व माण तालुक्यातील एकूण ४२०४ हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून नव्या दराप्रमाणे ८ कोटी ९७ लाख रुपयांची निधी वितरीत करण्यात येणार आहे.

अतिवृष्टीमुळे रस्ते व पुलांचे मोठे नुकसान झाले आहे. या रस्ते व पुलांच्या दुरुस्तीचा ४६८ कोटी २४ लाखांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने स्वतंत्ररित्या पाठविला आहे. त्यासाठी पाठपुरावा सुरु असल्याचेही पालकमंत्री श्री. देसाई यांनी सांगितले. तसेच १ जून ते ३१ ऑगस्ट दरम्यान झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे जिल्हा जिल्हा परिषदेच्या विविध इमारती यामध्ये शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, ग्रामपंचायती, विविध कार्यालये, रस्ते, साकव, पाण्याच्या योजना यांचे २२५ कोटी ४४ लाख हून अधिक नुकसान झाले आहे.

तर १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीतील अतिवृष्टी व पुरामुळे १४९ कोटी १४ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे, असे एकूण ३६४ कोटी ५८ लाख हून अधिक रक्कमेचे जिल्हा परिषद यंत्रणेच्या विविध बाबींचे नुकसान झाले आहे. मस्त्य व्यवसाय विभागाकडील ७६ लाखाहून अधिक जाळी, बोटी, मस्त्य बीज, मस्त्य साठा आदी बाबींचे नुकसान झाले आहे. जलसंधारण विभागाकडील पाझर तलाव, लघु प्रकल्पांचे २ कोटी ८७ लाख रुपये, जलसंपदा विभागाकडील कालवा, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे यांचे ४ कोटी ३८ लाखांचे नुकसान झाले आहे. महावितरण विभागाकडील विद्युत खांब, डीपी व अन्य असे १ कोटी १७ लाख रुपये, नगर पालिका विभागाकडील रस्ते, इमारती व अन्य बाबी यांचे ५ कोटी ३१ लाख, गृह विभागाकडील जवळपास ५० लाख असे जिल्ह्यात नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करावी- पालकमंत्री शंभूराज देसाई शेतकऱ्यांना विविध योजनांसह विविध नैसर्गिक आपत्तीमधील पिक नुकसानीची मदत सहजरित्या शेतकऱ्यांना मिळावी यासाठी ॲग्रीस्टॅकवर शेतकऱ्यांनी नोंदणी करावी. ही नोंदणी ॲड्राईड मोबाईलद्वारे स्वत: करावी किंवा महसूल, कृषी व आपले सेवा केंद्राच्या माध्यमातून करावी. ॲग्रीस्टॅक नोंदणीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत तातडीने मिळेल तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करावी, असे आवाहनही पालकमंत्री श्री. देसाई यांनी केले आहे.